सहायक महसूल अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गात नियमित पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत (पुणे विभाग)...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-१५०७१/७/२०२६-E-९ REV-(E-१७८७३८८)**
**मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- २७ ऑगस्ट, २०२६.**

वाचा :-

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई (सर्किट बेंच, कोल्हापूर) यांचे रिट याचिका क्र.११६३९/२०२५ मधील आदेश दि.१४.०७.२०२६ व २८.०७.२०२६
२. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.मह/अस्था-१(ई)/कावि/६२२/२०२६, दि.०३.०८.२०२६

शासन आदेश:-

मा.उच्च न्यायालय, मुंबई (सर्किट बेंच, कोल्हापूर) येथील रिट याचिका क्र.११६३९/२०२५ मध्ये दि.२८.०७.२०२६ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुणे विभागातील ०४ सहायक महसूल अधिकारी यांना नायब तहसिलदार (राजपत्रित, गट -ब) या संवर्गात सन २०२५-२६ या निवडसूची वर्षात खालीलप्रमाणे पदोन्नती कोट्यात रिक्त असलेल्या पदांवर खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, त्यांची नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना खालील तक्त्यातील स्तंभ क्र.५ येथे नमूद पदावर परिच्छेद क्र.२ येथील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

| अ. क्र | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नांव | पात्रता | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ५० | श्री.सचिन सुधाकर कुचेकर | सेवाजेष्ठतेच्याआधारे नियमित पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, कोरेगांव, जि.सातारा |
| २ | ५१ | श्री.जयंत बजरंग वीर | सेवाजेष्ठतेच्याआधारे नियमित पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा |
| ३ | ५२ | श्री.प्रशांत धीरज कदम | सेवाजेष्ठतेच्याआधारे नियमित पदोन्नतीस पात्र | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सातारा, जि.सातारा |
| ४ | ५३ | श्री.श्रीराम शिवाजी गुरव | सेवाजेष्ठतेच्याआधारे नियमित पदोन्नतीस पात्र | नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, वाळवा-ईश्वरपूर, जिल्हा सांगली |

२. सदर नियमित व तदर्थ पदोन्नती, पदोन्नती कोट्यात तसेच प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) नायब तहसीलदार संवर्गातील पदोन्नतीकरिता सहायक महसूल अधिकारी संवर्गाच्या दि.२७.०१.२०२६ रोजीच्या ज्ञापनाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांक १.१.२०२५ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीस कोणत्याही न्यायालयात स्थगिती देण्यात आलेली नाही या अटीच्या अधीन राहून वरील निवडसूचीस मान्यता देण्यात येत आहे.

२) निवडसूची तयार करताना दि.१३.०३.२०२४ च्या स्थितीस कोणीही ज्येष्ठ कर्मचारी अनवधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.

३) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५/५/२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि.(१६-ब) कार्यासनाच्या दि.०७/५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार तसेच दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

४) सदर निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची दक्षता विभागीय आयुक्त, पुणे यांनी घ्यावी.

५) नायब तहसिलदार या संवर्गात देण्यात येत असलेल्या पदोन्नती वरील अधिकारी पदस्थापनेनंतर प्रत्यक्ष रूजू झाल्याखेरीज पदोन्नतीच्या संवर्गाच्या वेतनाचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

६) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी तात्काळ एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू करून घ्यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल विभागीय आयुक्त, पुणे या कार्यालयाने शासनास सादर करावा.

८) पदोन्नतीनंतर नायब तहसिलदार संवर्गात देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदांवर ३० दिवसांच्या आत रूजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता गमावली जाईल तसेच त्यांची पदोन्नती रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

९) सदर तात्पुरत्या पदोन्नतीच्या अनुषंगाने पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिकाऱ्यांची शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये.

१०) भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, पुणे विभाग या कार्यालयाची राहील.

३. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.११६३९/२०२५ मध्ये दिलेल्या आदेशास अनुसरून उक्त ४ (श्री.श्रीराम गुरव व इतर ३) कर्मचा-यांना सन २०२३-२४ या निवडसूचीचा दिनांक १३.०३.२०२४ हा मानीव दिनांक देण्यात येत आहे. त्याबाबतची कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांनी करावी. तथापि, त्यांना दि.१३.०३.२०२४ पासूनच्या वेतन व भत्त्यांची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. दि.१३.०३.२०२४ या पदोन्नतीच्या मानीव दिनांकास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांनी तात्काळ करावी.

तसेच उक्त याचिका क्र.११६३९/२०२५ मधील याचिकाकर्ते श्री. निस्सार शेख व इतर ४ यांचा नायब तहसिलदार पदावरील ज्येष्ठता दिनांक ते पदोन्नतीस ज्या स्थितीस पात्र ठरले असते, त्या स्थितीस निश्चित करण्याची कार्यवाही विभागीय पदोन्नती समितीच्या लगतच्या पुढील बैठकीत विभागीय आयुक्त, पुणे यांनी करावी.

४. वरील अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा कार्यभार संबंधित कार्यालय प्रमुख यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू होणे आवश्यक आहे.

५. सदर आदेश मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.११६३९/२०२५ मध्ये दिलेल्या आदेशास तसेच सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत.

६. हा आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२७११०१०७३१४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

VINAYAK JAKHALEKAR

Digitally signed by VINAYAK JAKHALEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=4A106D8AE9DC6F9C21243429B8A21E6762994D1EC1F8E4DB5EFA4D4EB46F5991, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D6A60D038156E6E790DF15F9D2E7618F71774B3A755DA77C0BDE0FC621C1435, cn=VINAYAK JAKHALEKAR
Date: 2026.08.27 11:02:24 +05'30'

**( वि. श. जाखलेकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
५. जिल्हाधिकारी, सातारा/सांगली.
६. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा/सांगली.
८. संबंधित अधिकारी (विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्यामार्फत).
९. निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.